पुढारी | कोल्हापूर, सोमवार
२७ जून २०१६

तंत्रज्ञानाबरोबर अभ्यासक्रमात बदल हवा

मुख्यमंत्र्यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रमांचे उद्‍घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. यावेळी डावीकडून पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, खा. संभाजीराजे छत्रपती. (छाया : संदीप मोरे)

कोल्हापूर : प्रतिनिधी

एकविसाव्या शतकात प्रगतीच्या दिशा कम्युनिकेशनच्या माध्यमातून जात आहेत. वायर नेटवर्क, व्हर्च्युअल क्लासरूमच्या माध्यमातून आज जगातील ज्ञानाची नवी कवाडे खुली झाली आहेत. जगातील सर्व ज्ञान आता तंत्रज्ञानामुळे सर्वांसाठी खुले आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर अभ्यासक्रमही बदलावे लागतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी शिवाजी विद्यापीठ येथे झालेल्या कार्यक्रमात केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण व संगणकशास्त्र विभाग इमारतीच्या भूमिपूजनाचे डिजिटल पद्धतीने कोनशिला अनावरण आणि कौशल्य व्यासपीठ [illegible] व्हर्च्युअल क्लासरूमचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. राजर्षी शाहू संशोधन केंद्र व म्युझियम कॉम्प्लेक्सचे डिजिटल पद्धतीने भूमिपूजनाचे कोनशिला अनावरण शालेय व उच्च, तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते झाले. यावेळी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार संभाजीराजे छत्रपती, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानाच्या राज्य प्रकल्प संचालिका मनीषा वर्मा आदीसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम विद्यापीठाच्या राजर्षी शाहू स्मारकात झाला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, उच्च व तंत्रशिक्षणातून आपण पदवीधर तयार करत सुटलो आहोत. या पदवीधरांकडे नोकरी व रोजगारासाठीचे ज्ञान आहे की नाही तसेच त्यांचा प्रत्यक्षात वापर होतो की नाही, हे पाहिले जात नाही. विद्यार्थ्यांना कार्यकुशल बनवणारे ज्ञान देणे ही आजची खरी गरज आहे. यासाठी डिजिटल शिक्षणाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जाऊ शकतो. त्यामुळे महाविद्यालयात पायाभूत सुविधा उभा करण्याची गरज आता उरलेली नाही. जग आणि देशाचा परीघ तंत्रज्ञानामुळे बदलत आहे. उच्च दर्जाचे शिक्षण हे सर्वसामान्य वर्गासाठी पोहोचवले पाहिजे. यासाठी डिजिटल हे माध्यम प्रभावी आहे. याच्या माध्यमातून राज्यभर चांगले काम सुरू आहे. व्हर्च्युअल क्लासरूम ही केवळ रूम नसून ज्ञानाचे भांडार बनले आहे.

प्रजासत्ताक दिनी मी डिजिटल माध्यमातून नागपूरमधील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच पुणे येथून मुक्ताच अकरा हजार शाळांशी डिजिटल माध्यमातून संवाद साधला. एकाचवेळी हजारोंशी सहज संवाद साधता येऊ शकतो असल्याचे हे प्रातिनिधिक उदाहरण आहे. डिजिटल माध्यमाचा परिणाम असा झाला आहे की इंग्रजी शाळा सोडून अनेक पालक जिल्हा परिषदेतील मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश घेऊ लागले आहेत. ग्रामीण आणि शहरी शिक्षणातील दरी डिजिटल शिक्षणामुळे भरून निघाली आहे.

बदलाबरोबर अनेक गोष्टी नव्याने समजून घेण्याची गरज भासू लागली आहे. आपल्या देशातील लोकसंख्येत वेगळ्या प्रकारचे आव्हान उभे राहिले आहे. यासाठी नवे अभ्यासक्रम तयार करावे लागतील. [illegible] अलीकडे [illegible] आधुनिक शिक्षण त्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून सामान्य माणसांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य केलेल्या राजर्षी शाहू महाराजांच्या भूमीतील शिवाजी विद्यापीठाची वाटचाल नेहमी प्रगतीपथावर राहू दे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शालेय शिक्षण व उच्च तंत्रशिक्षण मंत्री तावडे म्हणाले, राज्यात [illegible] माध्यमातून विद्यार्थ्यांना [illegible] विकासासाठी निधी देण्याचे केंद्र सरकारने दालन खुले केले आहे. अनेक वर्षे असा उपक्रम सुरू आहे. चांगल्या गोष्टी या चांगल्या लोकांच्याच कल्पनेतून सुरू होतात. त्यामुळे [illegible] माध्यमातून अलीकडे परिणाम [illegible] सुरू असल्याची कोल्हापूरशी त्यांनी [illegible]. मंत्री तावडे म्हणाले, शैक्षणिक गोष्टीसाठी केंद्र सरकार साठ टक्के व राज्य सरकार चाळीस टक्के अनुदान देते. हे अनुदान शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी दिले जात आहे. पण केंद्र सरकारने मोठ्याप्रमाणे कोटी रुपयांचे अनुदान दिले असल्याने विद्यापीठांमध्ये वेगळे चित्र निर्माण झाले आहे. शिवाजी विद्यापीठाने देखील अग्रेसर राहण्याचा प्रयत्न करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाच्या कामगिरीच्या प्रगतीचा आढावा घेतला स्पष्ट केले की, विद्यापीठ सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. [illegible] विद्यापीठाने देशात लौकिक मिळाला आहे. यासाठी प्रत्येक घटक परिश्रम घेत आहे. बेटी बचाओ, स्वच्छता अभियान यामध्ये तीनशे विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सामाजिक उपक्रमात आघाडी घेतली आहे. नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये विद्यापीठाने देशात अठ्ठाविसावा आणि राज्यात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी कर्मचाऱ्यांच्या कामाचा अहवाल मुख्यमंत्री फडणवीस यांना सादर केला.

कार्यक्रमास खासदार संजय पाटील, आमदार सुरेश हाळवणकर, आमदार अमल महाडिक, आमदार सुरेश खाडे, विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी, अधिविभागप्रमुख व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन आलोक जत्राटकर व धैर्यशील पाटील यांनी केले.

शंभरपैकी ७५ पदवीधर नोकरीस अपात्र

मुख्यमंत्री फडणवीस सध्याच्या शिक्षण पद्धतीविषयी म्हणाले, 'नॅसकॉम'ने केलेल्या सर्व्हेत असे आढळले आहे की, शंभरपैकी फक्त पंचवीस पदवीधर नोकरीस पात्र आहेत. याचा अर्थ ७५ पदवीधर नोकरीस अपात्र आहेत, असे असेल तर विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरसाठी उपयुक्त होईल असे शिक्षण दिले पाहिजे. कारण महाविद्यालयाच्या विस्तार वाढला म्हणजे गुणवत्ता वाढली, असे म्हणण्याचे दिवस राहिले नाहीत.

विद्यापीठाचे कौतुक

शिवाजी विद्यापीठाने देशात अठ्ठाविसावा आणि राज्यात पहिला क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांचे अभिनंदन; परंतु विद्यापीठ हे छत्रपती शिवाजींच्या नावाने आहे. त्यामुळे त्यांनी दुसरा क्रमांक मिळवायला नको. यापुढील काळात विद्यापीठाने देशात पहिल्या क्रमांकावर झेप घ्यावी. विद्यापीठाने व्हर्च्युअल क्लासरूमसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यापीठ संलग्न विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यास मदत होईल. डिजिटल पद्धतीने विद्यापीठ शिक्षण देण्यास प्राधान्याने असल्याचे दिसून येते, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शिवाजी विद्यापीठाचे कौतुक केले.